Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# सिंदेवाही पोलीसांची दारू तस्करांविरूध्द कार्यवाही ०५ लक्षचा मुदद्देमाल हस्तगत

दिनांक २०/०६/२०१९ रोजी सिंदेवाही येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी मारूती रिट्ज वाहनाने सिंदेवाही मार्गाने दारूची वाहतुक करणार आहे. अशा माहितीवरून सिंदेवाही, शिवाजी चौक येथे नाकेबंदी लावुन वाहनाची तपासणी दरम्यान मिळालेल्या माहितीप्रमाणे मारूती रिट्ज चारचाकी वाहन येतांना दिसले. सदर वाहन चालक पोलीसांची नार्केबदी पाहुन वाहन भरधाव वेगाने काढुन पळु लागला. पोलीस पथकाने तात्काळ सदर वाहनाचा पाठलाग करून वाहनास दसरा चौक येथे थांबवुन वाहन चालकास विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये २५ पेटया देशी दारू किं. २,५०,०००/—रू, एक चारचाकी मारूती रिट्ज वाहन क्र. एम.एचए ३१ डीसी १९५९ किं. २,५०,०००/—रू, **असा एकुण ५,००,०००/—रू** चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन सिंदेवाही येथे अप.क्र. ३२१/२०१९ अन्वये नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे १) निखिल दिलीप बांबोळे वय २५ वर्ष २) रितेश अमर शेंडे, वय २९ वर्ष, दोन्ही रा. आंबेडकर चौक सिंदेवाही यांना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास सिंदेवाही पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात सिंदेवाही प्रभारी पोनि. निशिकांत रामटेके, यांचे नेतृत्वात पोउपनि गोपीचंद नेरकर, गोमेद पाटील, शरद आवारे, पोना. गणेश मेश्राम यांनी पार पाडली.

---

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# दोन बेपत्ता अल्पवयीन मुलांना शोधण्यात पोलीसांना यश

फिर्यादी नामे विलास देवाजी ईटनकर रा. गोवरी ता. राजुरा जि. चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन राजुरा येथे दिनांक ०३/०२/२०१९ रोजी तक्रार नोंदविली की, त्यांचा १४ वर्षाचा मुलगा बेपत्ता झाला आहे. अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन राजुरा येथे अप.क्र. ७७/२०१९ कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन मुलाची शोध मोहिम पोलीसांनी सुरू केली. तब्बल चार महिन्यानंतर पोलीसांना मिळालेल्या तांत्रीक माहितीच्या आधारे अकलुज जि. सोलापुर येथे हा मुलगा असल्याची माहिती प्राप्त होताच तपास पथक सोलापुर येथे रवाना करून सोलापुर पोलीसांच्या मदतीने विलास ईटनकर यांचा चार महिन्यांपासुन बेपत्ता असलेल्या १४ वर्षाच्या मुलास शोधण्यास पोलीसांना यश आले. सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात राजुरा येथील उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री. शेखर देशमुख यांचे नेतृत्वात राजुरा पोलीस स्टेशन येथील तपास पथकाने पार पाडली.

त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन वरोरा येथे दाखल अप.क्र. ४५५/२०१९ कलम ३६३ भादंवि मधील बाबाराव रामटेके यांचा १४ वर्षाचा मुलगा दोन महिन्यापुर्वी वरोरा येथुन बेपत्ता झाला होता. या दरम्यान त्याचा आईवडीलांसोबत कोणताही संपर्क झाला नाही. याप्रकरणामध्ये सुध्दा मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात सायबर सेल येथील पथकाने मुलाचा शोध घेवुन त्यास दिल्ली येथुन चंद्रपुर येथे परत आणण्याकरीता महत्वाची कामगीरी बजावली.

---